**<u>नि.दि.दा.क्र. ३३५/२०११</u>**

विठ्ठल लबडे व इतर वि. राजाराम व इतर

**<u>नि.क्र.१०५ लगत.</u>**

**वादींतर्फे साक्षीदार क्र.२**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | मैनाबाई राजाराम लबडे |
| वय | – | ६० वर्षे, |
| व्यवसाय | – | मजुरी, |
| राहणार | – | टाकळी खंडेश्वरी, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. १ ते ३, २० व २२ तर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

७. विठ्ठल लबडे व मला माझ्या पतीने घराबाहेर हाकलून दिले त्यावेळेस विठ्ठलचे वय किती होते हे मला सांगता येणार नाही. त्यावेळेस विठ्ठल पहिलीच्या वर्गात शाळेत जात होता. हे खरे आहे की, त्यामुळे मी माझ्या पतीविरुध्द न्यायालयात पोटगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला. हे खरे आहे की, तेव्हापासुन माझा मुलगा विठ्ठल व मी एकत्र राहतो. माझे लग्न कुठे झाले व कधी झाले हे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, माझे लग्न झाल्यानंतर २ वर्षात मला दत्तात्रय लबडे हा मुलगा झाला. त्यानंतर विठ्ठल मुलगा झाला. हे खरे आहे की, त्यानंतर माझे व माझ्या पतीचे एकमेकांशी काही पटले नाही. कोर्टामार्फत तडजोड होऊन मी नांदायला गेले होते. न्यायालयात माझ्या पतीसोबत झालेली तडजोड मी दाखल केली होती. माझ्या मोठ्या मुलाच्या लग्नाच्या वेळेस राजाराम लबडे याच्यासोबत माझी तडजोड झाली. ती तडजोड मी न्यायालयात दाखल करु शकत नाही. त्याचे कारण मला सांगता येत नाही. हे खरे नाही की, तडजोड झाली नसल्यामुळे मी न्यायालयात तडजोड दाखल करु शकत नाही. हे खरे नाही की, माझ्या पतीने विकत घेतलेल्या जमिनी ह्या माझे त्यांच्यासोबत लग्न होण्यापुर्वी विकत घेतलेल्या आहेत. हे खरे आहे की, दावा मिळकती माझ्या पतीने कोणाकडून, कधी व किती रकमेला घेतल्या हे मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की, माझा मुलगा व नातु

यांनी दावा मिळकती कोणाकडून, कधी व किती रकमेला विकत घेतल्या हे मला सांगता येणार नाही. दाव्यातील मिळकतीचे सर्व्हे नंबर, गट नंबर व क्षेत्र मला सांगता येत नाही. हे मला सांगता येत नाही की, दावा मिळकती पती, मुलगा व नातु यांनी कशा घेतल्या. हे खरे आहे की, माझा दुसरा मुलगा दत्तात्रय याने १० वी झाल्यानंतर आयटीआयचा कोर्स केला. हे खरे आहे की, तो कोर्स त्याने अहमदनगर येथे केला. हे खरे आहे की, मुलगा दत्तात्रय याने कर्जत येथील श्री. बेद्रे याने ट्रॉली बनविण्याचे व वेल्डींगचे काम केले. हे खरे नाही की, माहिजळगाव येथे मुलगा दत्तात्रय याने स्वतः कष्ट करुन वेल्डींगचा व्यवसाय सुरु केला. हे खरे नाही की, माहिजळगाव येथील दत्तात्रय ने त्याच्या उत्पन्नातुन स्वतःच्या व त्याच्या मुलाच्या नावे मिळकती विकत घेतलेल्या आहेत. हे खरे नाही की, मुलगा दत्तात्रय याची स्वकष्टार्जित मिळकत असल्यामुळे वादमिळकतीत माझा कोणताही संबंध नाही. हे खरे आहे की, माझे पती राजाराम हे वयस्कर झालेले आहे. हे खरे नाही की, माझे पती वयस्कर झाल्यामुळे नेहमी आजारी असतात. हे खरे आहे की, माझ्या पतीने आजतागायत जमिन विक्री केली नाही. प्रतिवादी क्र. २२ नावे जमिन केल्याबाबतचे कागदपत्रे मी काढले आहेत. ती कागदपत्रे मी वाचलेली नाहीत, मला ते वाचता येत नाहीत. ती कागदपत्रे मी वकीलाकडून अथवा कोणाकडून वाचुन घेतलेली नाहीत. शपथपत्र दाखल करताना देखील मी ते पाहिले नाही, मला वाचायला येत नाही. प्रतिवादी क्र. २२ च्या नावे केलेल्या जमिनीचा गट नंबर मला सांगता येणार नाही. पुर्वी ती जमिन माझ्या पतीच्या नावे होती. ती मिळकत माझ्या पतीची वडीलोपार्जित मिळकत होती. ती मिळकत वडीलोपार्जित मिळकत असल्याबाबतची कागदपत्रे मी अभिलेखावर दाखल केले नाहीत.

**<u>मध्यान्नाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब.</u>**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT
Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.03.02 17:46:06 +0530

(आर. बी. राऊत)

दि.०२/०३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर